(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ ८०३८ दिनांक : ०९/०४/२०२१

**प्रति,**
**मुख्य अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.,**
**परिमंडळ कार्यालय (सर्व)**

**विषय: रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी वाढीव कालावधी (Grace Period) देण्याबाबत.**

**संदर्भ :** १. सामान्य आदेश क्र. ९३ (क) दि. ०५.०३.१९८०
२. प्रशासकीय परिपत्रक क्र. २७ दि. २०.०३.२००६

सामान्य आदेश क्र. ९३ (क) दि. ०५.०३.१९८० अन्वये रजा प्रवास सवलत योजना प्रसृत करण्यात आलेली आहे, तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. २७ दि. २०.०३.२००६ अन्वये रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी प्रत्येक गटवर्षाकरीता एक वर्षाचा वाढीव कालावधी (Grace Period) देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

२. रजा प्रवास सवलतीचे सन २०१६-२०१९ हे चार वर्षांचे गटवर्ष संपल्यानंतर सदर गटवर्षाच्या वाढीव कालावधीमध्ये म्हणजेच सन २०२० मध्ये कोवीड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्याने सदर कालावधीमध्ये कंपनीच्या कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलत योजनेच्या वाढीव कालावधीचा लाभ घेता आलेला नाही. यास्तव कर्मचाऱ्यांना जादा वाढीव कालावधी देण्याची बाब विचाराधीन होती.

३. वरील विषयाबाबत सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार कर्मचाऱ्यांना सन २०१६-२०१९ या गटवर्षाकरीता रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी एक विशेष बाब म्हणून आणखी एक वर्ष म्हणजेच दि. ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत वाढीव कालावधी (Grace Period) देण्यात येत आहे. सदर वाढीव कालावधी फक्त सन २०१६-२०१९ या गटवर्षाकरीता असेल.

४. सबब, आपणास कळविण्यात येते की, सदरच्या सूचना सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

**प्रत सस्नेह सादर :**
मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
--- त्यांना विनंती करण्यात येते की, Employee Portal प्रणालीमध्ये अनुषंगीक सुधारणा करण्यात याव्यात.

**प्रत रवाना :**
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.